सकाळ
सिंधुदुर्ग, गुरुवार,
२७ नोव्हेंबर २०१४

# दोडामार्गमधील वक्तृत्व स्पर्धेत कुडचीरकर प्रथम

दोडामार्ग, ता. २६ : येथील लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयातील फोरम ऑफ फ्री एंटरप्राइज, मुंबई पुरस्कृत ए. डी. श्रॉफ स्मृती वक्तृत्व स्पर्धेत मीना कुडचीरकर प्रथम आली.

२५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यात द्वितीय सागर गवस तर तृतीय क्रमांक भाग्यश्री गवस हिने मिळविला. उत्तेजनार्थ पौर्णिमा वराडकर व पल्लवी पार्टे यांनी पटकाविला. पहिल्या तीन क्रमांकाना रोख पारितोषिक व प्रशस्तीपत्र तर उत्तेजनार्थ दोन विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रे देऊन गौरविण्यात आले.

युवकांमध्ये आर्थिक विषयावर जागृती व चिंतन व्हावे, या उद्देशाने मुंबईतील फोरम ऑफ फ्री एंटरप्राईज या संस्थेने गेली ५० वर्षे सातत्याने ए. डी. श्रॉफ मेमोरिअल इलोक्युशन कॉंपिटिशन या नावाने या स्पर्धा आयोजित करीत आहे. या स्पर्धेत हळबे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. परीक्षक म्हणून सौ. हुनूसवाडकर, प्रा. डी. वाय. बर्वे, प्रा. डॉ. एम. टी. बेग यांनी काम पाहिले.

प्रमुख अतिथी म्हणून विवेकानंद नाईक उपस्थित होते. प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी केले. डॉ. पाटील यांनी स्वागत केले.